-: प्रेसनोट दिनांक- ०२/०३/२०२२ :-

**आरोपी लोकसेवक धर्मराज विलास काशिदकर, वय-४०, सहायक अभियंता, म.रा.वि.वि.कं.मर्या.ग्रामीण विभाग-२, ताराबाई पार्क,कोल्हापूर रा.ए-१,महालक्ष्मी पार्क,हॉकी स्टेडीयमजवळ, कोल्हापूर यांनी लाच मागणी केलेबाबत....**

---

यातील तक्रारदार हे महावितरण कंपनीचे ग्रामीण विभाग - २ अंतर्गत भागातील ट्रान्सफॉर्मर लोडींग-अनलोडींग (रिप्लेसमेंट) चे काम कॉन्ट्रक्ट बेसीसवर करतात. तक्रारदार यांचे कामाचे अनुषंगाने ग्रामीण विभाग - २ मधील भागातील ट्रान्सफॉर्मर लोडींग-अनलोडींग (रिप्लेसमेंट) च्या कामांची बीले मंजुरी करण्याचे काम श्री. काशिदकर, असिस्टंट इंजिनीअर (फिल्टर युनिट) यांचेकडे असते. तक्रारदार यांची यापुर्वीची पुर्ण झालेल्या कामांची बीले श्री. काशिदकर यांचेसमोर मंजुरीसाठी गेली असल्याने दि.२३.०२.२०२२ रोजी तक्रारदार यांनी श्री. काशिदकर यांची भेट घेतली असता, त्यांनी तक्रारदार यांचेकडे पुर्वीच्या कामांची बीले मंजुर करण्यासाठी प्रत्येक जॉबसाठी ५००/- रू. प्रमाणे तसेच पुढेही नेहमी पैसे द्यावे लागतील असे म्हणुन तक्रारदार यांचेकडे १०००००/- रूपये लाचेची मागणी केली.

सदर बाबत तक्रारदार यांनी दि.२३.०२.२०२२ रोजी तक्रार अर्ज दिला होता. तक्रारदार यांचे तक्रारीप्रमाणे दोन पंच साक्षीदारांचे समक्ष दि. २३.०२.२०२२ रोजी म.रा.वि.वि.कं.मर्यादित,ताराबाई पार्क, ग्रामीण विभाग -२ कोल्हापूर येथील लोकसेवक काशिदकर यांचे लाच मागणीबाबत पडताळणी केली असता, काशिदकर यांनी तक्रारदार यांची ग्रामीण विभाग - २ मधील भागातील ट्रान्सफॉर्मर लोडींग-अनलोडींग (रिप्लेसमेंट) च्या कामांची बीले मंजुर करणेकरीता तक्रारदार यांचेकडे पूर्वीचे बिलांचे ७५,०००/- रूपये नंतर बघू असे म्हणून आताचे बिलांचे पावशे प्रमाणे २५,०००/-रूपये होतात असे म्हणून तडजोडीअंती १५०००/-रूपये लाच मागणी करून ती लाच रक्कम तक्रारदार यांना घेवुन येण्यास सांगितल्याचे निष्पन्न झालेने त्यांचेविरूध्द सापळा कारवाई आयोजित केली असता, दिनांक ०२.०३.२०२२ रोजी म.रा.वि.वि.कं.मर्यादित,ताराबाई पार्क, ग्रामीण विभाग -२ कोल्हापूर येथे शासकीय पंच साक्षीदारांचे समक्ष तक्रारदार यांची ग्रामीण विभाग - २ मधील भागातील ट्रान्सफॉर्मर लोडींग-अनलोडींग (रिप्लेसमेंट) च्या कामांची बीले मंजुरी करणेकरीता तक्रारदार यांचेकडून १५०००/- रू. लाच रक्कम स्विकारल्यानंतर त्यांना काही वेळाने ताब्यात घेण्यात आले आहे.

नमुद प्रकरणी तक्रारदार यांचे फिर्यादीवरून **आरोपी लोकसेवक धर्मराज विलास काशिदकर, वय-४०, सहायक अभियंता,म.रा.वि.वि.कं.मर्या.ग्रामीण विभाग-२,ताराबाई पार्क,कोल्हापूर रा.ए-१,महालक्ष्मी पार्क,हॉकी स्टेडीयमजवळ, कोल्हापूर** यांचेविरुध्द शाहुपूरी पोलीस ठाणे, जि. कोल्हापूर येथे गुन्हा दाखल करणेची प्रकिया सुरु आहे.

सदरची कारवाई मा.श्री. राजेश बनसोडे, पोलीस उपआयुक्त/पोलीस अधीक्षक, अॅन्टी करप्शन ब्युरो, पुणे ,मा.श्री सुरज गुरव अपर पोलीस अधीक्षक, अॅन्टी करप्शन ब्युरो, पुणे व मा.श्री सुहास नाडगौडा, अपर पोलीस अधीक्षक, अॅन्टी करप्शन ब्युरो, पुणे यांचे मार्गदर्शनानुसार श्री. आदिनाथ बुधवंत, पोलीस उपअधीक्षक अॅन्टी करप्शन ब्युरो, कोल्हापूर, नितीन कुंभार, पोलीस निरीक्षक अॅन्टी करप्शन ब्युरो कोल्हापूर, सहा. फौजदार बंबरगेकर,पोहेकॉ शरद पोरे, पोना नवनाथ कदम,पोकॉ मयुर देसाई व पोकॉ रूपेश माने, अॅन्टी करप्शन ब्युरो, कोल्हापूर यांनी केली आहे.

**सर्व नागरिकांना आवाहन करणेत येते की, लाचेच्या अथवा अपसंपदेबाबत तक्रारी असल्यास लाचलुचपत प्रतिबंधक** विभागाच्या खालील कंमाकावर संपर्क साधावा.

१)मा.महासंचालक, लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, म.रा.मुंबई टोल फ्री कमांक :- १८००२२२०२१

२)मा.पोलीस अधीक्षक, लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, पुणे परिक्षेत्र, पुणे दुरध्वनी कमांक :- ०२०/२६१२२१३४, ०२०/२६१३२८०२, ०२०/२६०५०४२३.

३)श्री.आदिनाथ बुधवंत, पोलीस उप अधीक्षक, लाचलुचपत प्रतिबंधक विभाग कोल्हापूर मो.नं. ९०११२२८३३३, कार्यालय दुरध्वनी कमांक - ०२३१/२५४०९८९.

४)हेल्पलाईन टोल फ्री कमांक:- १०६४.

५)व्हॉट्स अप कमांक :- ७८७५३३३३३३.

Scanned by TapScanner